**इचलकरंजी महानगरपालिका**
**महिला व बालविकास विभाग**
**अंदाजपत्रक तयार करणेकामी दरपत्रक/कोटेशन नोटीस**

इचलकरंजी महानगरपालिका महिला व बालविकास विभागाकडील बालवाडी विद्यार्थ्यांना पोषक आहार स्वरुपात 1) राजगीरा लाडू (50 ग्रॅम) 2) शेंगदाने चिक्की (50 ग्रॅम) 3) देशी केळी (दोन नग) 5) उपिट/पोहे/शिरा (1 प्लेट) पुरविणेकामी अंदाजपत्रक तयार करणेस जी.एस.टी.धारक यांचेकडुन दरपत्रक / कोटेशन मार्गविणेत येत आहे. दिनांक- 23/05/2025 ते दि. 27 /05/2025 अखेर पर्यंत कार्यालयीन वेळेत महानगरपालिकेच्या बारनिशी विभागात स्विकारणेत येईल. प्राप्त दरपत्रक / कोटेशन दि.28/ 5 / 2025 दु. 4.00 वाजता उघडणेत येईल. याबाबतची सर्व अटी व शर्ती नोटीस बोर्डावर व महिला व बालविकास विभागाकडे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

(अशोक कुंभार)
उपायुक्त
इचलकरंजी महानगरपालिका

---

**अटी / शर्ती-**

1. संस्थेने स्टेनलेस स्टीलच्या हवाबंद डब्यातून पोषक आहार पुरविणे आवश्यक आहे.
2. संबंधीत बालवाडी कामकाजाच्या प्रत्येक दिवशी इकडील सुचनेप्रमाणे ताज्या पोषक आहाराचा तसेच पुरक आहाराचा पुरवठा संबंधीतांनी बालवाडी पर्यंत करावा लागेल. आहाराचा पुरवठा संबंधीतांनी बालवाडी मागणीपत्रानुसार आवश्यक तेवढयाच प्रमाणात करावा लागेल.
3. सदरचे दर जी.एस.टी. सह देणेचे आहेत.
4. इकडील सुचनेप्रमाणे आहार पुरवठयाचा वाहतुक खर्च स्वखर्चाने करणेचा आहे.
5. आहारचा पुरवठा हा स्वच्छ व ताज्या स्वरुपात विद्यार्थ्यांना करावयाचा आहे.
6. प्रत्यक्ष पुरवठा करावयाचा आहार शाळेतील बालवाडी शिक्षिकांच्या समोर वजन करुन दिला पाहिजे आणि तसे केलेबद्दल संबंधितांची पोच घेतली पाहिजे.
7. आहार पुरवठा करण्यासाठी मागविण्यात आलेले दरपत्रक / कोटेशन अर्ज कुठलेही लेखी अथवा तोंडी कारण न देता स्विकृत करणे, नाकारणे किंवा रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्तसो / उपायुक्तसो यांना राहील.
8. संस्थेस देणेत येणारी बालवाडी व विद्यार्थी संख्या यामध्ये बदल करण्याचा अधिकार मा. आयुक्तसो यांना राहील.
9. वरील अटी / शर्तीमध्ये आवश्यक ती वाढ करणे / सुधारणा करणे याबाबतचा अधिकार मा. आयुक्तसो व मा. उपायुक्तसो यांना राहतील.
10. उपरोक्त योजनेच्या अमंलबजावणीच्या अनुषंगाने संबंधित संस्थेस प्राप्त होणा-या रक्कमेवर आयकर विभाग व इतर विभागाकडून वेळोवेळी लागू करण्यात आलेला कर संस्थेने संबंधित विभागास भरणे / कपात करुन घेणे बंधनकारक असेल.
11. सदर कामी सर्व शासकीय कर, विमा प्राव्हीडंट फंड वगैरे भरणेचे जबाबदारी संस्थेची राहील.
12. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील सर्व संबधित तरतुदी लागु राहतील.

(अशोक कुंभार)
उपायुक्त
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner